फाईलीपृ. ४

महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था मुंबई व त्यांच्या अधिपत्याखालील प्रादेशिक कामगार संस्था, नागपूर या कार्यालयाच्या आस्थापनेवरील पदांच्या आढाव्यानुसार मान्य करण्यात आलेल्या आकृतीबंधाबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
शासन निर्णय क्र. एम.आय.एल. ११००/प्र.क्र. ८५३०/कामगार-६,
दिनांक :- २८ फेब्रुवारी, २००६.

वाचा :- १) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. असंक-१००१/प्र.क्र.२९/२००१/वित्तीय सुधारणा, दिनांक १०.९.२००१.

शासन निर्णय -

वित्त विभाग, शासन निर्णय क्रं. असंक-१००१/प्र.क्र.२९/२००१/वित्तीय सुधारणा, दिनांक १० सप्टेंबर, २००१ अन्वये सर्व विभागांनी त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील असलेल्या कार्यालयातील पदांचा आढावा घ्यावा, असे सूचित करण्यात आले होते. त्यानुसार कामगार विभागाच्या नियंत्रणाखाली येणा-या महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था, मुंबई व त्यांच्या अधिपत्याखालील प्रादेशिक कामगार संस्था, नागपूर कार्यालयाच्या आस्थापनेवरील सर्व मजूर पदांचा सर्वकष आढावा घेण्यात आला आहे. सदर आढाव्याअंती महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्थेच्या आस्थापनेवरील एकूण ६६ मंजूर पदापैंकी अतिरिक्त असणारी विविध संवर्गातील सोबत जोडलेल्या प्रपत्र एक मध्ये दर्शविलेली १५ स्थायी / अस्थायी पदे समर्पित करण्याचा निर्णय वित्त विभाग व उच्चस्तरीय सचिव समितीच्या मान्यतेने घेण्यात आला आहे.

२. महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्थेच्या व त्यांच्या अधिपत्याखालील प्रादेशिक कामगार संस्थेच्या पदांचा सर्वंकष आढावा घेऊन संवर्गनिहाय मंजूर पदे व त्यांची मानके विचारात घेऊन सोबत जोडलेल्या परिशिष्ट 'अ' मध्ये नमूद केल्यानुसार २७ संवर्गातील एकूण ५१ पदांच्या आकृतीबंधास शासन मान्यता देत आहे. सदर पदमर्यादितील व्यपगत झालेली पदे पुर्नजिवित करण्यासही शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

श्रम विज्ञान संस्था
महाराष्ट्र शासन

३. सदर मान्य करण्यात आलेल्या आकृतीबंधांतर्गत संस्थेतील कार्यक्रमाचे एकत्रीकरण करुन कार्यक्रम राबविण्यास आढाव्यामध्ये कमी केलेल्या पदांच्या पार्श्वभूमीवर याकरीता मान्यता देण्यात येत आहे. तसेच परिच्छेद क्रं. १.३ (ब) नुसार पदस्थापना, पदोन्नत्या किंवा आवश्यक तेथे कर्मचा-यांचे मुख्यालय बदलून सेवा वापरण्याबाबत प्रशासनिक विभाग व विभाग प्रमुख म्हणून संचालक यांना पूर्ण स्वातंत्र राहील.

४. सदरहू शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रं. ७३९/०५/वि.सु.-१, दि. २७.०१.२००६ अन्वये मिळालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(जे.पी. डांगे)
शासनाचे प्रधान सचिव

प्रति,

महालेखापाल (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई.
महालेखापाल (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-२, नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर.
संचालक, महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था, मुंबई.
उपसंचालक, प्रादेशिक कामगार संस्था, नागपूर.
सर्व उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी/कामगार विभाग.
सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन १२ / १४), मंत्रालय, मुंबई.
वित्त विभाग (व्यय-१६ / वित्तीय सुधारणा-१), मंत्रालय, मुंबई.
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (प्रशासन-१)/ (प्रशासन -३), मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती (कामगार-६).

शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग कमांक - एसआयएल-११००/ प्र.क्र. ८५३०/ कामगार-६, दिनांक २८ फेब्रुवारी, २००६ चे सहपत्र.

## परिशिष्ट - अ

### महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था, मुंबई यांच्या आस्थापनेवरील संवर्ग निहाय मंजूर पदाचा आकृतीबंध

| अ.क्र | पदाचे नाव | वर्ग | मश्रविसं मुंबई | प्राकासं नागपूर | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | संचालक | १ | १ | - | १ |
| २ | प्राध्यापक, औद्योगिक समाजशास्त्र | १ | १ | - | १ |
| ३ | प्राध्यापक, कामगार अर्थशास्त्र | १ | १ | - | १ |
| ४ | उपसंचालक | १ | - | १ | १ |
| ५ | अधिव्याख्याता, कामगार कल्याण | २ | १ | - | १ |
| ६ | अधिव्याख्याता, क्षेत्रकाम निर्देशक | २ | १ | - | १ |
| ७ | संशोधन अधिकारी | २ | १ | - | १ |
| ८ | अधिव्याख्याता, औद्योगिक अर्थशास्त्र | २ | १ | - | १ |
| ९ | प्रबंधक | २ | १ | - | १ |
| १० | अधिव्याख्याता | २ | - | १ | १ |
| ११ | अधिव्याख्याता, कामगार संघटना व औद्योगिक संबध (क.श्रं.) | ३ | १ | - | १ |
| १२ | फॅकल्टी सहाय्यक | ३ | - | १ | १ |
| १३ | संशोधन सहाय्यक | ३ | ५ | - | ५ |
| १४ | ग्रंथपाल | ३ | १ | १ | २ |
| १५ | सहाय्यक ग्रंथपाल | ३ | १ | - | १ |
| १६ | अधिक्षक | ३ | १ | १ | २ |
| १७ | वरिष्ठ लिपिक | ३ | १ | १ | २ |
| १८ | लघुलेखक | ३ | १ | - | १ |
| १९ | लघुटंकलेखक | ३ | ४ | १ | ५ |
| २० | रोखपाल/लिपिक टंकलेखक नि रोखपाल | ३ | २ | १ | ३ |
| २१ | लिपिक टंकलेखक | ३ | २ | १ | ३ |
| २२ | वाहन चालक | ३ | १ | - | १ |
| २३ | शिपाई | ४ | ५ | ३ | ८ |
| २४ | हमाल | ४ | १ | - | १ |
| २५ | माळी | ४ | १ | - | १ |
| २६ | रखवालदार | ४ | २ | - | २ |
| २७ | सफाईगार | ४ | २ | - | २ |
| | एकूण | - | ३९ | १२ | ५१ |

(जे.पी. डांगे)
शासनाचे प्रधान सचिव